





महाराष्ट्र शासन

सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्वे नं.१०४/१०५ येरवडा पोलीस स्टेशनसमोर, विश्रांतवाडी रोड,पुणे-०६
दुरध्वनी -०२०-२९८०९९३७ Email ID -adobcpune२०२३@gmail.com

जा.क्र. ससंइमाबकपुणे/भासाशि/महाडीबीटी/एन.एस.पी /२०२६-२७/९०५ दि.१३.१०.२०२६

प्रति,

प्राचार्य,

अनुदानित /कायम विनाअनुदानित/

व्यावसायिक / बिगर व्यावसायिक/

कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये (पुणे जिल्हा).

विषयः PM YASASVI Pre & Post Matric Scholarship Scheme For OBC, EBC & DNT योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ: मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, संचालनालय म.रा पुणे यांचे पत्र क्र.५८७३ दि.१३.१०.२०२६

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, "PM YASASVI Pre & Post Matric Scholarship Scheme For OBC, EBC & DNT Students" योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचना प्राप्त आहेत. या योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ मध्ये पूर्णशाने केवळ NPS Portal वरच करावयाची असल्याचे निर्देश संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

❖ PM YASASVI Post Matric Scholarship Scheme For OBC, EBC & DNT Students.

१. इमाव (OBC) च्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती

२. विमाप्र (SBC) च्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.

३. विजाभज (VJNT) च्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.

४. व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय मुलींसाठी मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती

वरील चार योजनांसाठीचे फ्रेश अर्ज केवळ NSP पोर्टलवरच करावेत. यासाठी नवीन अर्ज करण्याची सुविधा महाडिबीटी पोर्टलवर असणार नाही याची गांभीर्याने नोंद घेवून या योजनांसाठीचे अर्ज NSP पोर्टलवर भरण्याच्या सूचना आपल्या मार्फत सर्व विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

महाडिबीटी पोर्टलवर अर्ज सादर करावयाच्या योजना -

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती VJNT व SBC प्रवर्गातील इयता ११ वी व १२वी विद्यार्थी

२. व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणारे व व्यावसायिक महाविद्यालयांशी संलग्न वसतिगृहात राहणारे VJNT व SBC विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.

३. इमाव, विमाप्र व विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती योजना.

४. इमाव (OBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

५. विमाप्र (SBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

६. विजाभज (VJNT) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

७. व्यावसायिक प्रशिक्षण शुल्काची परतफेड OBC, VJNT व SBC, प्रवर्गातील विद्यार्थी. (शासकीय किंवा खाजगी आयटीआय मध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी यांचे करिता)

वरील सात योजनांचे अर्ज पुर्ववत महाडिबीटी पोर्टलवर भरण्यात यावेत. तथापि सन २०२६-२७ करीता सदर योजनांचे अर्ज नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर करण्याकरीता केंद्र शासनामार्फत विहित कालावधी खालील प्रमाणे निश्चित करण्यात आला आहे -

Scheme Open From	Student Application Open Till	Defective Application Verification Open Till	Institute Verification Open Till	DNO/SNO/MNO Verification Open Till
१७.०७.२०२६	३०.११.२०२६	१५.१२.२०२६	१५.१२.२०२६	३१.१२.२०२६

सदर योजनेकरीता संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.३१.११.२०२६ पर्यंत आहे. त्याअनुषंगाने सदर योजनेचे अर्ज करण्याबाबतची कार्यपध्दती नुसार १०० टक्के पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरण्यात येतील याची खबरदारी घेण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

(प्रदिप संकपाळ)
सहायक संचालक
इतर मागास बहुजन कल्याण पुणे